# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.12.2024** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातल्या 71 हजारांहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान
2. राज्यातल्या ग्रामीण भागातील गरीबांसाठी 19 लाखांहून अधिक घरं देण्याची केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा
3. संशोधकांचं काम प्रयोगशाळांपुरतं मर्यादित न राहाता शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलं पाहिजे-शिवराज सिंह चौहान
4. पुणे विमानतळावरील नव्या टर्मिनलवरून आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणे सुरू आणि
5. ज्येष्ठ चित्रपट निर्माते-दिग्दर्शक श्याम बेनेगल काळाच्या पडद्याआड; कलाक्षेत्रातून शोक व्यक्त

**रोजगार मेळावा**

गेल्या दीड वर्षांत सुमारे 10 लाख युवकांना सरकारी नोकरी मिळाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये नव्यानं रुजू होत असलेल्या 71 हजारांपेक्षा जास्त युवक युवतींना पंतप्रधानांच्या हस्ते काल  दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्र वितरित करण्यात आली. पुणे आणि नागपूरसह देशभरात 45 ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तर पुण्यामध्ये तळेगाव इथं सीआरपीएफ ग्रुप सेंटरमध्ये केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते विविध सरकारी विभागातील सुमारे 500 जणांना नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यात आलं. 2047 पर्यंत भारताला विकसित देश बनवण्याचा पंतप्रधानांचा संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी देशाच्या युवा वर्गावर आहे आणि युवा वर्ग या संधीचं नक्कीच सोनं करेल, असा विश्वास मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केला.

**पंतप्रधान आवास- चौहान**

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी 19 लाख 66 हजार घरं यंदा देण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल पुण्यात केली. किसान सन्मान दिवसाच्या निमित्ताने पुण्यातील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्र सरकारनं कृषी क्षेत्रासाठीची आर्थिक तरतूद वाढवली असल्याचं त्यांनी सांगितल. नैसर्गिक शेतीचं महत्त्व सांगताना चौहान म्हणाले.....

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक समृद्ध करण्याची गरज असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले....

**<u>गोखले</u>**

पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कृषि आर्थिक संशोधन केंद्राच्या 70 व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमातही कृषिमंत्री चौहान यांनी काल सहभाग घेतला. भारताचं कृषीक्षेत्र इतर देशांच्या तुलनेत भक्कम असून या क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं ते यावेळी म्हणाले. भारताला जगाचं खाद्य भांडार बनवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, संशोधकांचं काम केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित न राहता ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 25 डिसेंबर रोजी नदी जोड प्रकल्प सुरू करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>पाचवी आठवी</u>**

इयत्ता पाचवी आणि आठवीच्या वर्गात अनुत्तीर्ण होऊनही विद्यार्थ्यांना पुढल्या वर्गात ढकलण्याचं धोरण केंद्र सरकारने रद्द केल्याची माहिती केंद्रीय शिक्षण सचिव संजय कुमार यांनी दिली आहे. इयत्ता पाचवी आणि आठवीच्या वार्षिक परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढच्या दोन महिन्यांत पुन्हा परीक्षा देण्याची संधी आता मिळणार आहे. या पुनर्परीक्षेत विद्यार्थी पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास मात्र त्यांना पुढच्या वर्गात जाण्याची संधी दिली जाणार नाही. या विद्यार्थ्यांना त्यांचं प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही शाळेतून काढूनही टाकलं जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>पुणे विमानतळ</u>**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील 3 मार्गांवरची 5 आंतरराष्ट्रीय उड्डाणे कालपासून नव्या टर्मिनल वरून सुरू करण्यात आली. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली. मोहोळ यांनी काल या सर्व तांत्रिक बाबी आणि प्रक्रियेचा आढावा घेतला. पुणे विमानतळावरील नव्या टर्मिनलवरुन होणाऱ्या उड्डाणांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आली असून इमिग्रेशनच्या यंत्रणेबाबतची प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे.

**<u>राहुल गांधी-मुंबई</u>**

परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस कोठडीतल्या मारहाणीमुळे झाला असून या हत्येला जबाबदार असणाऱ्या पोलिसांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची राहुल गांधी यांनी काल भेट घेतली. त्यावेळी ते वार्ताहरांशी बोलत होते. दरम्यान काँग्रेस नेते राहुल यांचा परभणी दौरा पूर्णपणे राजकीय असल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात वार्ताहरांशी बोलताना केली.

**<u>क्षयरोग</u>**

राज्यात कालपासून क्षयरुग्ण शोधमोहीम सुरू झाली. या अंतर्गत क्षयरोग होण्याची जोखीम असलेल्या भागात जाऊन आरोग्य कर्मचारी माहिती घेत आहेत. देशातील निवडक 347 जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबवण्यात येत आहे.

**श्याम बेनेगल निधन**

ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 90 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर मुंबईतल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते; उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. समांतर चित्रपटांची धुरा वाहणारे खंदे निर्माते दिग्दर्शक अशी ओळख असलेले श्याम बेनेगल यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात जाहिरात क्षेत्रापासून केली.

त्यानंतर जवळ जवळ एका दशकानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या अंकुर या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. मंथन, भूमिका यासारख्या त्यांच्या अनेक चित्रपटांनीही राष्ट्रीय पुरस्कार मिळवले. चित्रपट क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

भारत एक खोज सारखी दूरचित्रवाणीवरील मालिका, माहितीपट, लघुपट आणि चरित्रपटांबरोबरच काही व्यावसायिक चित्रपटही त्यांनी केले. मुजीब द मेकिंग ऑफ नेशन हा त्यांनी दिग्दर्शित केलेला अखेरचा चित्रपट ठरला. त्यांच्या निधनानं कला क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यानीही श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

ज्येष्ठ दिग्दर्शक डॉक्टर जब्बार पटेल यांनी आकाशवाणीशी बोलताना श्याम बेनेगल यांच्या आठवणींना उजाळा दिला.....

**अपघात**

पुण्यात वाघोलीमध्ये पदपथावर झोपलेल्या 9 जणांना काल पहाटे डंपरने चिरडलं. या दुर्घटनेत तिघांचा जागीच मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन मुलांचा समावेश असून जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. मद्यप्राशन करून गाडी चालवणाऱ्या डंपर चालकाचं गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. चालकाला अटक करण्यात आली असून त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**हवामान**

राज्याच्या काही भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.